# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०३ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- दिव्यांगांना बाधामुक्त वातावरण निर्माण करून देण्याला समाजाने प्राधान्य द्यावं – राष्ट्रपतींचं आवाहन
- सुगम्य भारत–सुलभ भारत अभियानाला नऊ वर्ष पूर्ण–आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन विविध कार्यक्रमांनी साजरा
- सिटीझन फर्स्ट हा भारतीय न्याय संहितेचा मूलमंत्र असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

आणि

- नवनिर्वाचित सरकारच्या शपथग्रहण सोहळ्याच्या तयारीचा महायुतीच्या नेत्यांकडून आढावा

****

दिव्यांगांना बाधामुक्त वातावरण निर्माण करून देणं, याला समाजाने प्राधान्य द्यावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आज आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. दिव्यांगांना सहजता आणि समानतेची वागणूक देणं हे समस्त मानवतेचं कर्तव्य असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपतींनी केलं.

यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी

अनेक कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला, यामध्ये ब्रेल लिपीतल्या पुस्तकांच्या पोर्टलचा समावेश आहे.

****

दरम्यान, केंद्र सरकारनं सुरु केलेल्या सुगम्य भारत, सुलभ भारत अभियानाला आज नऊ वर्ष पूर्ण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांग लोकांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी २०१५ मध्ये 'दिव्यांग' शब्द वापरण्यास सुरुवात करण्याचं आवाहन केलं होतं. 'सुगम्य भारत अभियान' आणि 'एक देश, एक सांकेतिक भाषा' यांसारख्या पावलांमुळे दिव्यांगांच्या जीवनात बदल घडून आला आहे. आता त्यांना समान संधी, शिक्षण आणि रोजगार मिळत आहेत. कल्याण इथं राहणारे शंकर साळवे यांना दिव्यांगत्वामुळे आलेल्या अनेक अडचणींवर सुगम्य भारत अभियानातून मिळालेल्या विविध सुविधांच्या माध्यमातून मात करता आली, त्यासाठी त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

> ***सुगम्य भारत अभियानाच्या माध्यमातून आमचे लाडके पंतप्रधान महोदय यांनी आमच्या दिव्यांग बंधुभगिनींसाठी खूप चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. गेल्या वीस वर्षांपूर्वीचा जर इतिहास पाहिला तर आज आम्ही जे मतदान केंद्र बघतो, पूर्वी त्या ठिकाणी आम्हाला कोणीतरी उचलून घेऊन जाऊन, खूर्चीवर उचलून घेऊन जाऊन त्या ठिकाणी मी मतदान करायचो. आज प्रत्येक मतदान केंद्रांवर रँपची सुविधा आहे, व्हीलचेअर आहे. आणि दिव्यांगांना लागणाऱ्या ज्या काही सोयी सुविधा आहेत, त्या आपल्या सुगम्य भारत अभियानाच्या माध्यमातून सर्व ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.***

****

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनाच्या औचित्याने आज ठिकठिकाणी विविध कार्यक्रम घेण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा समाज कल्याण कार्यालय आणि जिल्हा परिषदेच्या वतीने एक कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी केलेल्या भाषणात, दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी प्रशासनानं तसंच विविध संघटनांनी सहकार्य करण्याचं आवाहन केलं. समाज कल्याण विभागाच्या वतीने

दिव्यांग व्यक्तींसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. २०२४-२५ या वर्षा दरम्यान निवड जालेल्या दिव्यांग लाभार्थींना घरकुल, निर्वाह भत्ता, तीन चाकी स्कूटर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आल्या. समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे यांनी याबाबत अधिक माहिती दिली –

***विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच स्कूटर याचे वाटप करण्यात आलेले आहे. काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरती प्राविण्य मिळवलेले असल्याने त्यांचाही सत्कार यानिमित्ताने करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर लवकरच दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. समाज कल्याण विभाग नेहमीच दिव्यांग लाभार्थ्यांसाठी उत्कृष्ट पद्धतीने कार्य करत आहे.***

****

परभणी शहरात दिव्यांग दिनानिमित्त रॅली काढण्यात आली, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. दिव्यांग संघटना, शाळेतील विद्यार्थी, समाज कल्याण विभागाचे अधिकारी, आरोग्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

बीड इथं दिव्यांग दिनानिमित्त रॅली काढण्यात आली, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला.

****

दिव्यांग दिनानिमित्त नांदेड इथं जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. समाजाने दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन करनवाल यांनी केलं.

दरम्यान, नांदेडमध्ये बेरोजगार दिव्यांग कल्याण कृती संघर्ष समितीच्यावतीने विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

****

अदानी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी आजही निदर्शनं केली. लोकसभेचं कामकाज सुरू होताच, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या मुद्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. मात्र हे मुद्दे शून्य प्रहरात उपस्थित करावेत, असं

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या खासदारांनी काही काळासाठी सभात्याग केला. शून्यकाळात समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव यांनी, संभल प्रकरण हे सुनियोजित षड्यंत्र असल्याचा आरोप करत, या प्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी केली.

राज्यसभेतही समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी संभल हिंसाचारप्रकरणी प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर समाजवादी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला.

****

भारत आणि चीनच्या संबंधात सुधारणा होत असल्याचं, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत या विषयावर बोलत होते. येत्या काही दिवसांतच दोन्ही देशांमध्ये सीमेवरचा तणाव कमी करण्यासंदर्भात चर्चा होणार असल्याचं, जयशंकर यांनी सांगितलं. गेल्या काही वर्षांत भारत चीन संबंध आणि सीमेवर त्याचा परिणाम, याचा परराष्ट्र मंत्र्यांनी आढावा घेतला.

****

रशिया आणि युक्रेन यांच्यात लाल समुद्रावरून सुरू असलेल्या संघर्षामुळे भारतातून पाश्चिमात्य देशांमध्ये जाणाऱ्या जहाजांना, आफ्रिकेच्या केप ऑफ गुड होपला वळसा घालून जावं लागत आहे. यामुळे भारताच्या निर्यातीवर काही अंशी प्रभाव पडल्याचं, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं आहे. ते आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात बोलत होते.

****

दरम्यान, लोकसभेत आज बँकिंग कायदा सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू झाली, तर राज्यसभेनं आईलफिल्ड नियमन आणि विकास सुधारणा विधेयकाला मंजुरी दिली.

****

सिटीझन फर्स्ट हा भारतीय न्याय संहितेचा मूलमंत्र असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशभरात नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी झाल्यानंतर पंतप्रधानांनी आज चंडीगढ इथं या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या प्रात्यक्षिकांचं अवलोकन केलं, त्यानंतर ते बोलत होते. या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ती आणि संस्थांचे त्यांनी आभार

मानले. हे तीन कायदे देशाच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातला मैलाचा दगड ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

***भारतीय न्याय संहिता का मूलमंत्र है सिटीजन फर्स्ट। ये कानून नागरिक अधिकारों के प्रोटेक्टर बन रहे है। ईज ऑफ जस्टीस का आधार बन रहे है। पहले एफ आय आर करवाना भी कितना मुश्किल होता था। लेकिन अब झीरो एफ आय आर को भी कानुनी रूप दे दिया गया है।***

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी परवा मुंबई दौऱ्यावर येत आहेत. नवनिर्वाचित राज्य सरकारच्या शपथग्रहण सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत. परवा ५ तारखेला सायंकाळी आझाद मैदानावर होणाऱ्या शपथविधी सोहळ्याच्या तयारीची महायुतीतल्या नेत्यांनी आज पाहणी केली. या सोहळ्याला पंतप्रधानांसह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, इतर केंद्रीय मंत्री यांच्यासह, राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. हा कार्यक्रम शासकीय असला तरी, योग्य ते नियोजन करण्याची जबाबदारी महायुतीची आहे, म्हणून आपण सर्व तयारीवर लक्ष ठेऊन असल्याचं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. या सोहळ्याला साधू महंत, कलाकार, साहित्यिक यांनाही निमंत्रित केलं जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

दरम्यान, नागपूरच्या रामनगर इथं चहाचं दुकान चालवणारे गोपाल बावनकुळे यांना शपथग्रहण समारोहात उपस्थित राहण्याचं निमंत्रण फोन द्वारे मिळालं आहे. गोपाल बावनकुळे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे चाहते म्हणून ओळखले जातात.

****

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत दादर इथं चैत्यभूमीवर होणाऱ्या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत घेतला. महापरिनिर्वाण दिनाच्या तयारीमध्ये कोणतीही कमतरता राहू नये असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. अनुयायांना राहण्यासाठी तंबू, आरोग्य सुविधा, पुरेशी शौचालये, जेवण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची सोय, जागोजागी मदत कक्ष स्थापन करावे तसेच येणाऱ्या गर्दीचे योग्य नियोजन करावे अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

****

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त आज परभणीतील देवगिरी सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आलं, जिल्ह्यातील सर्व वार्ताहर, प्रतिनिधी पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेते यांची यावेळी तपासणी करण्यात आली.

****